प्रेसनोट दि.०९/१२/२०१७

# तरुणीच्या नावाने बनावट फेसबुक अकाऊंट तयार करुन तीचे फोटो अपलोड करणाऱ्या उच्चशिक्षीत तरुणास सायबर क्राईम सेल, गुन्हे शाखा, पुणे शहरकडुन अटक

कात्रज पुणे भागात राहणाऱ्या उच्चशिक्षीत तरुणीला रात्री अपरात्री वेगवेगळ्या इसमांचे फोन येवु लागल्याने तीने त्यातील एका इसमास माझा फोन नंबर तुम्हाला कसा मिळाला याबाबत विचारले असता समोरील व्यक्तीने सांगितले की, तुमच्या नावाने फेसबुक अकाऊंट आहे व त्यावर तुमचा फोटो व मोबाईल नंबर आहे. परंतु पिडीत मुलीचे फेसबुक अकाऊंट नसल्याने तीने दुसऱ्या दिवशी जवळच्या सायबर कॅफेमध्ये जावुन स्वतःच्या नावाचे फेसबुक अकाऊंट चेक केले असता तीच्या नावाचे बनावट फेसबुक अकाऊंट असल्याचे व त्यावर तीचे फोटो व मोबाईल नंबर अपलोड असल्याचे तीच्या निदर्शनास आल्याने पिडीत तरुणीने सायबर क्राईम सेल, गुन्हे शाखा, पुणे शहर येथे तक्रारी अर्ज दिला होता. अर्जाच्या चौकशीअंती भारती विद्यापिठ पोलीस स्टेशन येथे गु.र.न.५८२/१७ माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००८ चे कलम ६६(सी) नुसार गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

सदर गुन्ह्याच्या समांतर तपास सायबर क्राईम सेल, गुन्हे शाखा पुणे शहर यांच्या मार्फतीने करण्यात येत होता. त्यानुसार सायबर क्राईम सेलने पिडीत मुलीच्या फेसबुकबाबतची माहिती प्राप्त करुन त्याचे तात्रिक विश्लेषण केले. त्यावरुन सदरचे बनावट अकाऊंट हे **नितीन दत्तात्रय बंड वय-२८ वर्ष धंदा- व्यावसाय रा. मु.पो.जळगाव जामोद जि. बुलढाणा** या उच्चशिक्षीत तरुणाने तयार केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यास तात्काळ ताब्यात घेण्यात आले आहे. सदरच्या आरोपीकडे चौकशी करता सदरचा आरोपी हा पिडीत तरुणीच्या ओळखीचा असल्याने व वैयक्तीक वादामुळे पिडीत तरुणीची बदनामी करण्यासाठी सदरचे बनावट अकाऊंट तयार केल्याचे निष्पन्न झाले आहे. सदरच्या आरोपीस पुढील कारवाईसाठी भारती विद्यापिठ पोलीस स्टेशनच्या ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कामगिरी पोउपनि सोनाली फटांगरे आणि सायबर सेलकडील पो.ना. अजित कुरे,पोशि नितेश बिचेवार, मपोशि शुभांगी मालुसरे यांनी केली.

तरी फेसबुक या सोशल वेबसाईडवर फेक अकाऊंट तयार करुन त्यावर फोटो अपलोड करुन छेडछाड करण्याचा प्रयत्न आपलेसोबत किंवा आपल्याजवळील व्यक्तींसोबत झाल्यास सायबर क्राईमसेल पुणे येथे त्वरीत संपर्क साधावा.